[illegible]

( [illegible] )

## भगवंतराव पंत अमात्य

मार्च १७१६ च्या सुमारास रामचंद्रपंत अमात्यांचा मृत्यु झाला. त्यांना भगवंतराव रामचंद्र उर्फ बाजीराव, मोरेश्वर रामचंद्र उर्फ आप्पाजीराव आणि शिवरामपंत असी तीन मुले व त्र्यंबुबाई नावाची एक मुलगी होती.

भगवंतरावांचा जन्म माघी पौर्णिमा शके १५९८ म्हणजे सन १६७६ च्या दरम्यान झाला असावा असे आबा चांदोरकर म्हणतात.[१] रियासतकार सरदेसाई यांनी मात्र भगवंतरावाच्या जन्माची तारीख ६ फेब्रुवारी १६७७ अशी दिली आहे.[२] या दोन्ही उल्लेखानुसार भगवंतरावांचा जन्म १६७६ – १६७७ च्या सुमारास झाला असावा असे वाटते. भगवंतरावाच्या जन्मामुळे छ. शिवाजी महाराजांनासुध्दा आनंद झाला असावा म्हणून त्यानी मौ. सेळोली तर्फ खानापुर हा गाव भगवंतरावास दुधभाता निमित्त इनाम दिला होता. ह्याच इनाम वतनाचे कोल्हापूरकर छ. शिवाजी महाराजांनी इ.स. १७०४ मध्ये नुतनीकरण करुन दिले होते.

> ' तुम्हास पुत्र संतान झाले नव्हते. राजश्री भगवंतराऊ हे तुम्हास पुत्र जाले हे संतोषावार्ता के.राजश्री स्वामीस जाली. यावरुन के. स्वामी कृपाळु होऊन रा.भगवंतराव रामचंद्र यास दुधभातानिमित्त मौ.सेळोली तर्फ खानापूर येणे प्रो. मोईन करुन दिली आहे.'[3]

इ.स. १६९९ मध्ये भगवंतरावाना हत्तीतोड व खोदमिरा ही दोन वतने वंशपरंपरागत मिळाली. तशा आशयाचे पत्र आज उपलब्ध आहे. हे पत्र परशराम त्र्यंबक प्रतिनिधी यांनी चिंदर येथील दोन बाग वंशपरंपरा दिल्याबद्दलचे पत्र भगवंतरावाना पाठवले आहे, त्यामध्ये ते म्हणतात,

> ' राम सेणवे व गुणा सेणवे कुलकर्णी चिंदर याजकडुन दोन्ही बाग दूर करुन हत्तीतोड व खोदमिरा दोन्ही ठिकाणे बागाईत ... तुम्हास वतन करुन दिले असे. येविशी महालीचे कारकुनास आज्ञापत्र सादर केले असे. त्यावरुन ते दोन्ही बाग तुम्हे स्वाधीन करतील ....'[४]

रामचंद्रपंत अमात्यांच्या मृत्युनंतर कोल्हापूर छ. संभाजी राजानी भगवंतरावांना अमात्यपद दिले. ९ मार्च १७१६ चे भगवंतरावाचे "हुकूमतपन्हा" अशा उल्लेखाचे पहिले पत्र उपलब्ध आहे. आरंभीची कांही वर्षे त्यानी सुरळीत पणे कामकाज केले. पण नंतर छ. संभाजीशी उघड संघर्ष होऊ लागला. विशेषात: १७२४ पासून त्यांचा वादाला अधिक्य तीव्रता येऊ लागली होती. या दोघांच्या मधील वाद अधिक्य विकोपास जात होता. एका पत्रामध्ये भगवंतराव अमात्य म्हणतात,

> "तीन पिढ्या सेवा केली. त्याचे सार्थक जाहले. ज्यानी दिले त्यानी घेतले. हा दंडक कोठेही नव्हता, या राज्यात पाहिला..."[५]

छ. संभाजी आणि भगवंतराव यांचे खटके होते. भगवंतराव म्हणतात तीन पिढ्या सेवा केली. त्याचे सार्थक झाले. असा कायदा कोठेही पाहिला नव्हता. या संभाजीच्या राज्यात पाहिला पुढे आणखी एका पत्रात ते म्हणतात,

> "शाहू राजे यांच्या राज्यात सरदार सरकारकडून लक्षाचे लक्ष जिल्हे पावले बहुत सुखरूप आहेत"[६]

याचा अर्थ भगवंतराव पंत अमात्यांना वाटत होते की साताऱ्याच्या राजामध्ये सरदाराना मान आहे. त्यांची बुज राखली जाते. तसे महत्त्वाचे स्थान व मान कोल्हापूरच्या राज्यात नाही. साताऱ्याच्या राज्यात कामगिरीला भरपूर वाव मिळतो. पराक्रमास बक्षीस मिळते आणि कोल्हापूरच्या राज्यात मात्र कामही नाही आणि प्रतिष्ठाही नाही. अशा आशयाची पत्रे भगवंतरावानी लिहिली आहेत. यावरून भगवंतरावाचा ओढा हा सातारकर छ. शाहूकडे होता हे दिसून येते. थोरले छ. शिवाजी महाराजांनी वतनदारांची वतने काही प्रसंगी विशेषत: शिक्षा म्हणून, काढून घेतल्याची उदाहरणे आहेत. हे वतनविषयक धोरण कोल्हापूरच्या छ. संभाजीनी, साताऱ्याच्या छ. शाहू पेक्षा, पुढे चालविल्याचे या उदाहरणावरून स्पष्ट होते.

भगवंतरावानी मांडलेल्या या मुद्द्याना आणि तक्रारींना छत्रपतींच्या वतीने

व्दारकोजी यादव यांनी उत्तरे दिली आहेत. ती अतिशय महत्वाची आहेत. या उत्तरामधून छ.संभाजी व भगवंतराव यांच्यातील संबंध चांगले करण्याचा प्रयत्न व्दारकोजींनी केला होता असे दिसते.

> ` हे किमर्थ की आपण ब्राह्मण लोक,परंपरागत सेवक ,जिवत हे क्षणभंगुर आहे, ज्या धणियांचे कृपांजळे हे पद प्राप्त झाले, त्यासी निमकहराम न होता कल्याणाभिवृध्दि इच्छिल्यांने आपल्यास श्रेयस्कर, येणे करून धर्म,अर्थ,काम,मोक्ष ,चतुर्विध पुरूषार्थ प्राप्त होतात .'[७]

संभाजी व भगवंतराव यांचे संबंध चांगले व्हावेत म्हणून हिम्मतबहादुर उदाजीराव चव्हाण यांनीसुध्दा प्रयत्न केले होते. पण भगवंतरावाची मनस्थिती व्दिधा झाली होती त्याना साताऱ्याचे आकर्षण स्वार्थी पोटी वाटत होते त्यामुळे संभाजी व त्यांच्यातील संबंध हे नेहमी वाईट होते. साताऱ्याच्या छ.शाहूनी चिमाजी अप्पाना पाठविलेल्या पत्रात ` राणोजी घोरपडे व भगवंतराव यांनी संभाजी राजांची अमर्यादा केली ' असे स्पष्टपणे म्हटले आहे.

संभाजी आणि भगवंतराव यांच्यातील संबंध बिघडण्यास एक महत्वाचे कारण होते ते म्हणजे ताराबाईचा मुलगा शिवाजी याचा पुत्र रामराजा यास गुप्तपणे वाढवण्यास भगवंतरावाने मदत केली होती. इ.स.१७१४ मध्ये रामचंद्रपंताच्या मदतीने ताराबाई, छ.शिवाजी व त्यांची पत्नी भवानीबाई यांना पन्हाळ्यावर कैद केले गेले. राजसबाईचा मुलगा संभाजी करवीरच्या गादीवर आला. कैदेतच छ.शिवाजीची पत्नी भवानी बाई बाळंत झाली आणि तिला मुलगा झाला. या मुलास राजसबाइकडून धोका होता. म्हणून त्या मुलास बावड्याला पाठवले व त्याच ठिकाणी तो वाढला. त्याचेच नाव रामराजा असे ठेवले होते.

" याच वेळी शिवाजीची पत्नी गरोदर होती. ती प्रसूत होऊन तिला शाके १६३४ साली पुत्र झाला. याचे नाव रामराजे असे ठेवले. याचा घातपात करावा अशी बुध्दी राजसबाईची दिसल्यावरून पुत्र वारला असे बाह्यात्कारी उठवून रामचंद्रपंताचा

पुत्र भगवंतराव यांच्या अनुमते बावड्यास वाड्यात दाई व माणसे देऊन त्या पुत्रास पाठवून दिले" ९

छ. शिवाजी कोल्हापूरकर यांचा वंश गुप्त पणे वाढवण्यास व सुरक्षित ठेवण्यास भगवंतरावानी मदत करावी ही गोष्ट छ. संभाजींना पसंत पडणे शक्य नव्हते. त्याविरुध्द ते काही करु शकले नाहीत. मात्र या प्रकरणाचा संताप मात्र ते भगवंतरावांच्या बाबतीत व्यक्त करत.

याच वेळी साताऱ्याचे छत्रपती शाहू व कोल्हापूरकर संभाजी यांच्यातील संघर्ष विकोपास गेला होता. शाहूच्या विरोधात संभाजीने निजामाची मदत घेण्याचे ठरवले होते. त्यादृष्टीने त्याने निजामास पत्र सुध्दा पाठवले होते. मराठ्यांच्यामधील दुही निजामास हवीच होती म्हणून त्याने तातडतोब संभाजीस पत्र पाठवून सैन्यासह बोलावले. त्या पत्रामध्ये नबाब म्हणतो,

> " संभाजीने किल्ले, कोट, ठाणी आणि सरदार व मुत्सद्दी यांची राजकारणे व भेद होतील तितके करुन निघून यावे याप्रमाणे ठरवून " भगवंतराव पंत अमात्य " यानासुध्दा घेऊन संभाजी राजे नबाब कडे गेले. "[१०]

इ.स. १७२८ मध्ये झालेल्या या पहिला बाजीराव पेशवा, निजाम, संभाजी यांच्यातील युध्दात भगवंतराव आपल्या फौजेसह हजर होता. या लढाई नंतर संभाजीसह तो पन्हाळ्यास आला. या काळामध्ये संभाजी व भगवंतराव यांच्यातील संबंध अधिकच बिघडलेले दिसतात. कारण संभाजीने भगवंतरावाची कांही वतने जप्त केली आहेत. त्यामुळे भगवंतरावाने वारंवार विनंती पत्रे पाठवून " आमचे चालत आल्याप्रमाणे चालवावे " असे कळवले आहे. भगवंतराव आपले म्हणणे व मागण्या संभाजीस कळविण्याकरता आपले लोक पाठवत होता. पण तो स्वत: जात नव्हता. कारण संभाजीच्या वागणुकीविषयी त्याला संशय वाटत होता. संभाजीने भगवंतरावास ६ मे १७२८ रोजी पाठवलेल्या या पत्रावरुन भगवंतरावाच्या मनात संभाजी विषयी किती संशय होता हे कळेल.

"तुम्हास दोन पत्रे स्वामींनी याच्याविषयी पाठविली. तुम्चे विषयी स्वामींचे चित्ती कांही संशय असेल तर श्रींची शपथ असे .. तुम्ही चित्तांतील संदेह दूर केला नाही. तरी स्वामिसंनिध याच्यास अनमान केला, हे तुम्हास उचित नव्हे "[११]

"..अमात्यास संभाजींचे आपल्याविषयीच्या वागणुकीचा संशय वाटत होता. यामुळे ते त्यांचे समक्ष भेटीस जात नव्हते.."[१२]

छ.संभाजी राजांच्या ह्या संशयी वर्तणुकीने आणि त्रासाला कंटाळून ते हे राज्य सोडून जाण्याविषयी संभाजींची राणी जिजाबाई कडे आज्ञा मागू लागले.

"तुम्ही चित्तात एक प्रकार आणून तेथे श्रीमंत मातुश्री साहेबांपाशी आज्ञा मागत म्हणोन वर्तमान विदीत झाले."[१३]

या प्रमाणे १७२८ मध्ये त्यांनी आपला लहान भाऊ, मोरेश्वर रामचंद्र उर्फ आप्पाजीराव यास संभाजी महाराजांच्यांकडे सोपवून व त्याकडून अमात्याचे काम घ्यावे असे सांगून भगवंतराव साताऱ्यास शाहूंच्या भेटी करता गेले. इ.स. १७२९ मध्ये भगवंतराव साताऱ्याहून परत आले व त्यांनी आपले अधिकार परत आपल्या हातात घेतले."[१४]

याचवेळी परत एकदा शाहू व संभाजी यांच्यातील संघर्षास सुरुवात झाली. संभाजीराजानी आपल्या सर्व सरदारांना पत्रे पाठवून मदतीसाठी बोलावून घेतले. त्यामध्ये भगवंतरावांचा सुध्दा समावेश होता.

"..संभाजी राजे यांनीही लढाईला तोंड देण्याची जय्यत तयारी केली. आपल्या अष्ट प्रधानांना आणि सरदारांना पत्रे पाठवून आपआपल्या फौजेसह तांतडीने हजर होण्याची आज्ञा केली. त्र्यंबकराव घोरपडे व भगवंतराव पंत अमात्य यांनी आपल्या फौजा घेऊन युध्दाच्या तयारीने वारणेच्या काठी शाहू महाराजांच्या फौजेसमोर तळ ठोकून राहिले..."[१५]

ऑगस्ट १७२९ पासून फेब्रुवारी १७३० पर्यन्त जवळ जवळ ६ महिने या युध्दाची तयारी दोन्हीकडे चालू होती. १७३० मध्ये हे मराठ्यांच्या इतिहासातील महत्वाचे युध्द झाले आणि यात कोल्हापूरकर छ.संभाजीचा निर्णायक पराभव झाला. त्या दोघात वारणेचा तह झाला. या तहान्वये या दोघांनी आपआपल्या राज्याच्या सीमा ठरवून घेतल्या.तसेच या युध्दात इचलकरंजीकर त्र्यंबकराव घोरपडे आणि भगवंतराव पंत यांना शाहूने पकडले होते. छ.संभाजीनी दंड भरून यांची सुटका केली.` १६

वारणेच्या तहानंतर सुध्दा कोल्हापूरच्या राज्याला स्वस्थता लाभली नाही. शेजारच्या शत्रु राज्यांचा तर उपद्रव होताच. त्याप्रमाणे घोरपडे,पंत अमात्य, उदाजी चव्हाण आणि प्रतिनिधी यांचाही करवीर राज्याला उपद्रव होत होता. त्यामुळे संभाजी यांच्याविरुध्द वेळोवेळी छ.शाहूकडे तक्रार करत होता.वारणेच्या तहानंतर गगनगड व त्याखालील प्रदेश हा छ.संभाजीला मिळालेला होता पण पंत अमात्यांनी तो प्रदेश अजून संभाजीच्या ताब्यात दिलेला नव्हता. म्हणून संभाजीने ही तक्रार शाहूकडे केली. नंतर छ.शाहूने भगवंतरावास आज्ञापत्र पाठवून हा प्रदेश संभाजीला देण्यास सांगितले.

` स्वामींची व चिरंजीव राजश्री संभाजी राजे यांची भेट होऊन सोरश जाला. वारणेपासून तुंगभद्रे पावेतो मुलुख दरोबस्त देखील गडकोट ठाणी त्याकडे दिली. किल्ले गगनगड चि.राजश्री संभाजी यांकडे ठेविला असे तरी त्याची पत्रे घेऊन त्याचे स्वाधीन किला करणे...` १७

वारणेच्या तहानंतर ज्या अनेक सरदारांनी संभाजीस त्रास दिला होता त्यामध्ये सावंतवाडीच्या भोसले - सावंताचाही समावेश आहे. सावंतवाडीच्या फोंड सावंता ने जून १७३२ मध्ये घोणसर ओलवणीच्या डोंगरावर आपली फौज पाठवून ती टेकडी आपल्या ताब्यात घेऊन तटबंदी करण्याचा प्रयत्न केला. ही लष्करी हालचाल कोल्हापूर राज्याच्या प्रदेशावर हल्ला करण्यासारखीच होती.याच वेळी अमात्यांनासुध्दा एखादा किल्ला आपल्या ताब्यात असावा असे वाटत होते. म्हणून सावंताचे सैन्य त्या टेकडीवर येण्यापूर्वी भगवंतरावाने आपले सैन्य पाठवले व

ती टेकडी आपल्या ताब्यात घेतली आणि सावंतांचा बेत उधळून लावला. भगवंतरावाच्या या कृतीचे संभाजीने आज्ञापत्र पाठवून स्वागत केलेले दिसते. छ.संभाजी लिहितात,

> ` तेसमयी तुम्ही जमावानिसी जाऊन सावंतास ठाई करून ठेऊन जागा हस्तगत करून बळकटीने आहा पुढे त्या जागियावरून साहेबकाम करून आपले सेवेचा मुजरा करून घ्यावा. म्हणून निष्टापूर्वक लिहिले `[१८]

पुढे इ.स.१७३३ मध्ये अमात्यानी या ओलवणाच्या टेकडीवर ` सदानंद गड ` उर्फ ` शिवगड ` हा डोंगरी किल्ला बांधला यानंतर कांही दिवसानी भगवंतरावाने साळशी महालातील चिंदर गावी एक किल्ला बांधला व त्यास ` भगवंत गड ` असे आपले नाव दिले. या किल्ल्याच्या व्यवस्थेसाठी छ.संभाजीने कांही गावे इनाम दिली. यासंबंधीचे गोपाळ रामराव या भगवंतरावाच्या मुतालीकास छ.संभाजीनी पत्र पाठवले आहे.

`.. किल्ला नवा वसविला आहे तेथील बेगमी जाहलियाने जागा जतन होतो, म्हणून लिहिले ते कळले .. तर्फ साळशीची खेडी सुमारे ९ नऊ व तीा खारापाटण व तीा संवदळ या दोन माहालात रु. २००० दोन हजार दिले आहेत...`[१९]

इ.स.१७३४ मध्ये संभाजी आंग्र्यांनी आपली फौज पाठवून मोंदे गावाजवळील एक टेकडी आपल्या ताब्यात घेऊन तेथे किल्ला बांधण्यास सुरुवात केली . ही बातमी भगवंतरावास समजताच त्याने तानाजीराव खानविलकर व कृष्णाराव खानविलकर यांच्या बरोबर लष्कर देऊन युध्दास पाठविले. या युध्दात खानविलकरानी आंग्र्यांचा पराभव केला. आंग्र्यांचे लोक पळून जात असताना त्याचा खानविलकरांनी आपल्या हद्दीपर्यन्त पाठलाग केला .`[२०] यानंतर १७३५-३६ पर्यन्त छ.संभाजी व संभाजी आंग्रे यांच्यात लहानमोठ्या लढाया होतच राहिल्या. शेवटी १७३६ मध्ये आंग्र्ये यांनी भगवंतरावास पत्र पाठवून मैत्रीची अपेक्षा व्यक्त केली. त्यानुसार संभाजी आंग्रेनी लिहिले की ` ऐशास,आपला आमचा स्नेह अकृत्रिम होऊन आला व भेटीही जाहल्या. तेसमयी कितेक इष्टापूर्तीची भाषणे जाहली"[२१]

SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

भगवंतराव हा छ.संभाजीच्या बाजूने वेगवेगळ्या शत्रु बरोबर लढत असला तरी सुध्दा त्यांच्यातील संघर्ष कमी झालेला नव्हता. वारणायुध्दानंतर जो तह झाला त्या प्रसंगी आपली व्यवस्था लावण्याकरिता भगवंतराव साताऱ्यास गेला होता. त्यावेळी त्याला शाहूकडे दाद मागता आली नाही. पुन: १७४० मध्ये तो संभाजीबरोबर साताऱ्यास गेला. शाहूला आपले म्हणणे सांगितले. त्या ठिकाणी शाहूने दोघांच्यामध्ये तडजोड घडवून आणली. छ.संभाजीकडून भगवंतरावाची व्यवस्था नीट चालविण्याची शपथ घेतली. पण तरी सुध्दा संभाजीच्या राज्यात भगवंतरावाचे महत्व कमीच होत होते. कारण छ.संभाजीचे मन पूर्वग्रहदुषीत झालेले होते. त्यामुळे तो भगवंतरावास चांगली वागणूक देत नव्हता. त्यामुळे भगवंतराव वैतागुन निजामाकडे जाण्याच्या बेतात होता. या दिवसात त्याला साताऱ्याचे छ. शाहूकडून बोलावणे आले होते. कारण शाहू वृध्द झाला होता व रुग्णावस्थेत बिछान्यावर पडून होता. त्याला आपल्या पश्चात आपला वारस कोण नेमावा याची चिंता लागली होती. त्याने वारसदाराचा तपास करण्याचा हुकूम सोडला आणि यासाठीच शाहूने भगवंतरावास बोलावून घेतले. कारण ताराबाईने आपला नातू म्हणजे शिवाजीचा मुलगा जिवंत आहे आणि तो बावडयास भगवंतराव पंत अमात्यांनी वाढवल्याचे सांगितले.

"... चि.रा.रामराजे बावडे यासी तुम्हा जवळ आहेत म्हणून तीर्थस्वरुप महाराज मातु:श्री काकीसाहेबानी स्वामी जवळ सांगितले. त्याजवरुन आम्ही रा.भगवंतराऊन नरहरी दप्तरदार दा मजमू यासी पाठविले."[२२]

म्हणून छ.शाहूचे भगवंतरावाना बोलावून ही घटना सत्य आहे म्हणून आपल्या हातावर कृष्णेचे पाणी घालण्यास सांगितले.

"बाजीराव (भगवंतराव ) अमात्य आहेत. अमात्यानी येऊन माझे हातावर श्रीकृष्णेचे उदक घालावे. म्हणजे माझी खात्री होईल आणि मूळ राज्यांचा धनी आहे. दुसरा मुल दत्तक घेणेचा कारण नाही..."[२३]

अखेर भगवंतराव शाहूच्या भेटीस आला. तो म्हणाला की, `संभाजींनी आपणास कोल्हापूरचे राज्य अविरोध प्राप्त व्हावे म्हणून शिवाजीचे दोन मुलगे ठार केले. तसेच यालाही ( रामराजास ) तो मारील या भितीने त्याला ताराबाईने माझ्या हवाली केले. मी त्यास त्याची चुलती पांडव देशाची निंबाळकर हिच्याकडे नेऊन ठेविला...`[२४]

पुढे साताऱ्याच्या छ.शाहूचा सन १७४९ मध्ये मृत्यु झाला. पेशवा नानासाहेबाने पानगावाहून रामराजे ह्याना आणले आणि ४ जानेवारी १७५० रोजी त्यांना सिंहासनावर बसविण्यात आले. यावेळी अमात्यपदी भगवंतराव रामचंद्र याची नेमणूक केली. रामराजे यांचे संगोपन केल्याबद्दल भगवंतरावाना एकप्रकारे अमात्यपदाची बक्षीसीच मिळाली होती. वास्तविक छ.शाहूच्या सांगण्यावरुनच त्याना कोल्हापूरचे अमात्यपद मिळाले होते पण संभाजी बरोबर त्याचे संबंध राहिले नव्हते अर्थात यावेळी संभाजी व त्याची राणी जिजाबाई यांनी भगवंतरावाला कोल्हापूरलाच रहाण्याविषयी खुप विनंती केली होती. पण भगवंतरावाने त्याचे ऐकले नाही. त्याने साताऱ्याचे अमात्यपद स्वीकारले, जात असताना त्याने आपला थोरला मुलगा कृष्णराव भगवंत यास संभाजीकडे ठेवले. त्याप्रमाणे छ.संभाजीनी इ.स. १७५० मध्ये करवीरचे अमात्यपद कृष्णराव भगवंत यास दिले.`[२५]

रामराजाने भगवंतरावास अमात्यपद दिले व त्या सोबत इतर भावांच्या पण नेमणुका केल्या.यावेळी अमात्यास दिलेल्या आज्ञापत्रातील सारांश असा,

> `तुम्चे दुरख पूर्ववत तुम्हास द्यावे म्हणौन आज्ञा जाली. त्यावरुन पेशजीचे दसदाराकडुन दूर करुन तुम्चे अमात्यपद व सर्व लिहिण्याचे दरख करार करुन दिल्हे याची तैनात सालीना बीं मानी होन पातशाही `
>
> `खुद्द तुम्हास अमात्यपद व जातीची नेमणूक १२००० शिवराम पंडित यास छंदोग्य अमात्यपद व नेमणूक ६००० बाबूराव शिवराम पंडित यास फडणिशी व नेमणूक ५००० नारायण शिवराम पंडित यास दुप्तरदारी व नेमणूक २०००`[२६]

भगवंतराव आता साताऱ्याचे अमात्य झाले. परंतु सर्व सत्ता आता पेशव्याच्या हातात गेलेली होती. मराठ्यांचा छत्रपती आता नामधारी राहिलेला होता. त्यामुळे छत्रपतींची व भगवंतरावाची सुध्दा परिस्थिती अतिशय बिकट बनलेली होती. पुढील पत्र भगवंतरावाने जिजाबाईला पाठवून परिस्थिती किती कठीण बनली आहे हे सांगितले आहे.

> ` विनंती उपर सिमगा आला. उदक होली. येक तिरनका खर्चास नाही. धणियासी कोणी अर्ज करीत नाही .. आम्ही काय करावे ? इलाज नाही ... आम्ही फजिती होत आहे. रांडा पोरास अन्न आजी दोन महिने नाही. मातुश्रींनी निर्दया केली आहे... ` [२७]

या पत्रामध्ये आपली व आपल्या कुटुंबियांची परिस्थिती कशी आहे हे सांगितले आहे आणि क.छ.संभाजीची राणी जिजाबाईकडे मदतीची अपेक्षा व्यक्त केली आहे. पुढे एका पत्रात ते म्हणतात,

> ` परंतु आम्हास पोटास नाही. उपवासी मरतो.. कर्जदारी जालो. धणियाचे चाकरीमुळे आम्हे घर बुडाले. सरंजाम नाही. माणसे घोडी व हत्ती मरतात... ` [२८]

अशा वाईट परिस्थितीमध्ये १७५५ मध्ये पुण्यात भगवंतरावाचा मृत्यु झाला. १७३१ मध्ये झालेल्या वारणेच्या तहामध्ये भगवंतरावाचा रत्नागिरीचा सुभा व काही उत्पन्न शाहूकडे गेले होते. हा गेलेला प्रांत व प्रदेश पेशव्याकडे दिलेला होता. हा प्रदेश आपणास परत मिळावा या हेतून भगवंतराव १७५५ मध्ये पुण्यास पेशव्याकडे गेला होता. याच वेळी त्याचा मृत्यु झाला.

भगवंतराव रामचंद्र हे रामचंद्रपंत अमात्याचे सर्वांत मोठे चिरंजीव होते. मराठ्यांच्या राज्यामधील ते एक प्रामाणिक व हुशार असे अमात्य होऊन गेले. पण यांच्या प्रामाणिकपणाचे म्हणावे तसे चिज झाले नाही. रामचंद्रपंताप्रमाणे ती मुत्सद्दी राजकारणी नव्हता. पण तेजस्वी व बाणेदार होता एका पत्रामध्ये संभाजीची राणी जिजाबाई लिहिते ` तुम्हासही रामचंद्रपंतानी सकलकलाविद्या संपन्न केले, त्यामागे आपण प्रतिदिनी पुराण श्रवण, देवब्राह्मणाचे ठायी भक्ति धरिली इत्यादि सर्वही नीति तुम्हास करत लाभले [२९] ` म्हणजे भगवंतराव हुशार,

प्रामाणिक व धार्मिक होता.

भगवंतराव रामचंद्र यांनी कोल्हापूरचे अमात्यपद ३० वर्षे आणि साताराचे अमात्यपद पाच वर्षे चालविले. भगवंतरावांनी राजघराण्यातील एका गादीच्या हक्कदार राजपुत्राच्या जिवाच्या रक्षणार्थ विश्वासाने वागले यामुळे त्यावेळी गादीवर असणाऱ्या कोल्हापूरच्या संभाजीच्या रोषास व संशयास कारण झाले. यामुळे त्यांचे खूपच नुकसान झाले, पुष्कळ प्रदेश गेला, राज्यकारभारात पुढे येता आले नाही व आपली कर्तबगारीही दाखविता आली नाही.

भगवंतराव पंत अमात्यांच्या वडिलांनी म्हणजे रामचंद्रपंतांनी मुत्सद्देगिरीचे राजकारण करून आणि युक्तीने किर्ती मिळविली होती. आपल्या वडिलांच्या प्रमाणे आपणसुध्दा कीर्ती मिळवावी अशी भगवंतरावाची खूपच इच्छा होती.परंतु रामराजे यांना गुप्त ठेवण्याच्या कामी मदत केल्यामुळे संभाजीराजांनी याना प्रथमपासून पुढे येण्याची संधी दिली नाही. आपल्या वडिलांच्या पराक्रमावर आपणास स्थान मिळेल असे भगवंतरावांना वाटत होते पण ते शक्य झाले नाही. त्यांच्या या वृत्तीविषयी सरदेसाई म्हणतात,

' परंतु शिळ्या पराक्रमावर उत्पन्ने खाण्याची चटक महाराष्ट्र मंडळास लागल्यामुळे संभाजीच्या राज्यात डाळ शिजली नाही '[30] स्वतःचे कर्तृत्व न दाखविता केवळ पूर्वजाच्या वतनावर आपली उपजिविका करणाऱ्यामध्ये रियासतकारांनी भगवंतरावाची गणना केली आहे. कोल्हापूर-सातारा संघर्षात दुहेरी निष्ठा ठेवल्यामुळेही भगवंतरावाची प्रगती झाली नाही. त्याचे कर्तृत्वाचे मूल्यमापन रियासतकार सरदेसाई यांनी वस्तुनिष्ठपणे केले आहे ते लिहितात,

> ' भगवंतराव बराच कर्तृत्ववान व हुषार होता, परंतु वडिलास राज्यात प्रमुखपणा मिळाले तसेच आपणास मिळाले पाहिजे या भलत्या नादात त्याचे सर्व आयुष्य फुकट गेले. '[३१]

## टीपा


| | | |
|---|---|---|
| १ | आ.बा.जोशी आणि आबा चांदोरकर(संपा.), | श्रीशिवशाहीचा लेखनालंकार, (पुणे:आबा चांदोरकर १९३४) प.क्र.९, पृ.क्र.४५. |
| २ | गो.स.सरदेसाई, | मराठी रियासत, पुण्यश्लोक शाहू ५ (मुंबई :के.भि.ढवळे,१९४२)पृ.क्र.७५. |
| ३ | के.गो.सबनीस(संपा.), | पंत अमात्य बावडा दप्तर (गगनबावडा:सेक्रेटरी ज.बावडा १९३७) भाग पहिला प.क्र.५२,पृ.क्र.१०५. |
| ४ | | कित्ता, पृ.क्र.५७. |
| ५ | वि.का.राजवाडे(संपा.), | मराठयांच्या इतिहासाची साधने, (विजापूरकर वि.गो.१९०३), खंड ८वा प.क्र.९९,पृ.क्र.१२४. |
| ६ | स.मा.गर्गे, | करवीर रियासत, (पुणे:राणे प्रकाशन १९८०)पृ.क्र.१४२. |
| ७ | राजवाडे, | तत्रैव - पृ.क्र.१२५. |
| ८ | गो.स.सरदेसाई, | मराठी रियासत, मध्यविभाग ३ (पुणे:के.भी.ढवळे) पृ.क्र.२१३. |
| ९ | बा.प्र.मोडक, | कोल्हापूर प्रांताचा अर्वाचीन इतिहास (पुणे:आर्यभूषण छापखाना,१९२५) पृ.क्र.३०. |
| १० | | कित्ता,पृ.क्र.३१. |
| ११ | राजवाडे, | तत्रैव - पृ.क्र.१२९. |

| | | |
|---|---|---|
| १२ | रा.म.गोरे , | बावडेकर पंत अमात्य हुकूमतपन्हा याचे वंशवृत्त, (प्रकाशनाचा तपशिल उपलब्ध ) पृ.क्र.९२. |
| १३ | राजवाडे , | तत्रैव ,पृ.क्र.१२०. |
| १४ | गोरे , | तत्रैव ,पृ.क्र.८३. |
| १५ | वि.का.राजवाडे(संपा.), | मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड ३रा,पृ.क्र.४५३. |
| १६ | गर्गे , | तत्रैव - पृ.क्र.१३९. |
| १७ | आ.ग.पवार (संपा.), | ताराबाईकालीन कागदपत्रे (कोल्हापूर :शिवाजी विद्यापीठ प्रकाशन )खंड ३रा,प.क्र.८४, पृ.क्र.१०१. |
| १८ | वि.का.राजवाडे (संपा.), | मराठ्यांच्या इतिहासाची साधने (विजापूरकर वि.गो.१९०३)खंड ८वा, प.क्र.१३६,पृ.क्र.१६१. |
| १९ | | कित्ता - प.क्र.१३६,पृ.क्र.१६१. |
| २० | गोरे , | तत्रैव - पृ.क्र.८७. |
| २१ | राजवाडे , | तत्रैव - प.क्र.१५१, पृ.क्र.१७४. |
| २२ | | कित्ता - पृ.क्र.२००. |
| २३ | गर्गे , | तत्रैव - पृ.क्र.१८३. |
| २४ | पवार , | तत्रैव - पृ.क्र.३२८. |
| २५ | जोशी आणि चांदोरकर , | तत्रैव - पृ.क्र.४५. |

| | | |
|---|---|---|
| २६ | वि.का.राजवाडे , | "धाकटा शिवाजी व धाकटा रामराजा" संकीर्ण लेख संग्रह (विष्णु गोविंद विजापूरकर)(संपा.) पृ.क्र.७. |
| २७ | गो.स.सरदेसाई , | ताराबाई आणि संभाजी 'पे.दप्तरातून निवडलेले कागदपत्र', २६, (मुंबई: गव्ह. प्रिंटिंग प्रेस, १९३२) प.क्र.५२. पृ.क्र.४५. |
| २८ | | कित्ता - पृ.क्र.५३. |
| २९ | गो.स.सरदेसाई , | मराठी रियासत, मध्यविभाग ३', पृ.क्र.२९१. |
| ३० | | कित्ता - पृ.क्र.२९१. |
| ३१ | गर्गे , | तत्रैव - पृ.क्र.१९१. |

••

# कृष्णरावपंत अमात्य

(१७५०-१७६१ )

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## कृष्णराव भगवंत पंत अमात्य

( १७५० - १७६१ )

छ. शाहुच्या मृत्युनंतर ( १७४९ ) सातार्‍याच्या गादीवर छत्रपती म्हणून रामराजाचे राज्यारोहन झाले. रामराजाला त्याच्या लहानपणी गगनबावड्यात वाढविल्यामुळे त्याची पंत अमात्य घराण्यावर विशेष श्रध्दा असल्याचे दिसते. रामराजाला लहानपणापासून वाढवणे आणि सातार्‍याच्या छत्रपतीपदावर आणून बसवणे यामध्ये भगवंतराव पंत अमात्यांचा महत्वाचा सहभाग होता. म्हणून रामराजाने भगवंतरावास सातार्‍यांचे अमात्यपद दिले होते, ही नेमणुक १७५० मध्ये दिली गेली. या नेमणुकीपूर्वी भगवंतरावाने कोल्हापूरच्या छत्रपतींची परवानगी-सातार्‍याचे अमात्यपद स्वीकारण्याबाबत- घेतल्याचे उपलब्ध कागदपत्रावरून दिसत नाही. कोल्हापूरचे छत्रपती संभाजी आणि पंत अमात्य भगवंतराव या दोघामागील संबंध दुरावल्याचे आपण यापूर्वीच्या प्रकरणात पाहिले आहे. भगवंतरावाचा ओढाही सातार्‍याकडे होता हे त्याच्या उपलब्ध अनेक पत्रावरून कळते. त्याप्रमाणे त्याला हे सातार्‍याचे अमात्यपद त्याला मिळाले.

सातार्‍याचे अमात्यपद स्वीकारल्यानंतर भगवंतरावाने कोल्हापूरच्या पंत अमात्य पदावर वेगळ्या मार्गाने आपले नियंत्रण ठेवल्याचे दिसते. त्याने कोल्हापूरच्या छ. संभाजीस अशी विनंती केली की, त्याने आपल्या मुलास अमात्यपद द्यावे.

भगवंतरावाची ही विनंती कोल्हापूरच्या छ. संभाजीने स्वीकारून कृष्णराव भगवंत यास १७५० मध्ये अमात्यपदाची वस्त्रे दिली.[१]

भगवंतराव पंत अमात्यांना दोन पत्नी होत्या. जेष्ठ पत्नी व्यंकुबाई ही निळोपंत पिंगळे पंतप्रधानाची मुलगी असून तिचा मुलगा कृष्णराव हा होता. व्यंकुबाईस इ.स. १७२१ मध्ये सांगरूळ हा गाव इनाम दिलेला होता.

छ.संभाजीने कृष्णरावास अमात्यपदाची नेमणूक देताना केवळ वंशपरंपरागत धोरणाचा विचार केल्याचे दिसून येते. कारण कृष्णराव हा अमात्यपद सांभाळण्यास अयोग्य होता. त्याची शारीरिक परिस्थिती अगदीच नाजूक झाल्यामुळे त्याला संतती होण्याची शक्यता फार कमी होती. कृष्णरावाच्या या अशक्त,रोगी प्रकृतीमुळे पंत अमात्यपदाची सूत्रे सुरुवातीपासूनच त्याची आई व्यंकुबाई हिच्या हाती आली. कृष्णरावाची जन्म तारीख आज उपलब्ध नाही. पद प्राप्तीच्यावेळी त्याचे वय अंदाजे ४५ ते ५० वर्षे पर्यन्त असावे.

कृष्णरावाचे लग्न झाले होते. परंतु त्यांच्या पत्नीविषयी तपशिल उपलब्ध नाही. फक्त गोरे यांनी लिहिलेल्या वंशवृत्तामध्ये कृष्णरावाची पत्नी १७८० मध्ये वारल्याचा उल्लेख आहे. कृष्णरावाच्या आजारपणामुळे त्यांना मूल होण्याची शक्यता त्याच्या कुटुंबियांना वाटत नव्हती. यामुळे कृष्णरावाचे धाकटे चुलते शिवरामपंत यानी आपला मुलगा कृष्णरावाने दत्तक घ्यावा अशी इच्छा भगवंतरावाजवळ व्यक्त केली. शिवरामपंत १७५४ पर्यन्त बावड्यातच रहात होते. १७५५ मध्ये भगवंतरावाच्या मृत्युनंतर छ.रामराजाने शिवरामपंतास साताऱ्याच्या पंत अमात्यपदी नेमले.

कृष्णरावाची कोल्हापूर राज्याचा पंत अमात्य म्हणून कारकिर्द १७५० ते १७६१ ही आहे. १७६१ मध्ये कृष्णराव मरण पावला. या अकरा वर्षांच्या कारकिर्दीमध्ये ज्या राजकीय घटना घडल्या त्याची सूत्रे कृष्णरावाची आई व्यंकुबाई हिच्या हातात होती. पण, कृष्णरावाच्या नांवाखाली पंत अमात्यपदाचा कारभार चालत असल्यामुळे त्याचा थोडक्यात आढावा घेणे अप्रस्तुत होणार नाही.

सन १७५५ मध्ये कृष्णराव भगवंत अमात्याने पुण्याला सदाशिवराव भाऊ यांना पत्र पाठवून आपला 'सांगरूळ' हा गांव करवीरकर छत्रपतींनी घेतला आहे व तो आपणास परत मिळवून देण्याची विनंती केली आहे त्या पत्रामध्ये कृष्णराव म्हणतात,

"मौजे सांगरनळाविसीं राजश्री स्वामींस व सौभाग्यादिसंपन्न मातुश्रीबाईसाहेब यांसीं पत्रे पाठविलीं तीं आपणाकडील जासुदा बरोबर देऊन पनाळियासा धणीं याकडे रवाना केले ... जासूदास महावर न घेता दखाजियासी येऊन पत्राचे उत्तर न देता निरोप दिल्हा ... आमचा अभिमान सर्व प्रकारे आपणास आहे तेथे विशेष काय लिहावे-" [२]

याच वेळी १७५५ मध्ये पेशवे पंतप्रधान यांनी आंग्र्यावर हल्ला केला. यावेळी कृष्णराव अमात्याच्या फौजेने कोल्हापूरकर छत्रपती यावतीने युध्दात भाग घेऊन चांगली कामगिरी केली यावेळी अमात्याकडील अनेक माणसे ठार व जखमी झाली. [३]

१७५५ च्या आंग्र्या बरोबरच्या झालेल्या या युध्दात शिवगड किल्ल्याचा सरनोबत, केदारजी पानकर, हा पराक्रमाने लढला व युध्दात कामी आला. या बद्दल त्यास घोणसरी हा गांव इनाम दिला, आणि सर्व हक्क पानकर यांच्या कुटुंबियास मिळावेत म्हणून महाराजाना विनंती पत्र पाठवले होते. [४]

सन १७५६ मध्ये त्र्यंबुबाईने कृष्णरावाच्या आजारपणामुळे मोरेश्वरराव उर्फ आप्पाराव या भगवंतरावाच्या भावास बावडा दौलतीचा कारभार करण्यास नेमले.

सन १७५७ मध्ये कोल्हापूरच्या संभाजीने कृष्णरावास पत्र पाठवून मौजे पारपनाळ व मौजे माजनाळ ह्या दोन गावच्या चौगुलकीचे वतन माहादजी मल्हार कुलकर्णी ह्याला देले आहेत व त्याप्रमाणे त्याना ते अधिकार द्यावेत असे कळवले आहे. [५]

इ.स. १७५९ मध्ये कृष्णराव अमात्यानीं साळशी महालातील नाधवडे या गांवी पागा बांधून तेथे कांहीं स्वार ठेवले होते. [६] अशात यावेळी कृष्णराव आजारीच होता. हे काम मोरेश्वरराव उर्फ आप्पाराव यानीं केले असले पाहिजे.

कोल्हापूरकर छ.संभाजीच्या मृत्यूची बातमी कृष्णराव अमात्याने राघो त्रिंबक यांच्याकडून पत्र पाठवून झुलकरजीच्या अनुबाई घोरपडे यांना कळवली. या पत्रामध्ये कृष्णरावाने छ.संभाजीच्या मृत्युबद्दल दुःख व्यक्त केले आणि छ.संभाजीच्या मृत्युनंतर कोल्हापूरला जाऊन जिजाबाईचे सांत्वन केले हे कळवले. त्याच बरोबर त्याने अनुबाईस कळवले की, या बाबतीत पेशव्यानी कोल्हापूर राज्याची योग्य ती व्यवस्था करावी. अनुबाई घोरपडे हिने या पत्राचे उत्तर देताना असे कळवले, की तिला कोल्हापूर राज्याची अनास्था नव्हती याबाबत तिने बाळाजी बाजीराव पेशव्यास ही कळवले होते. पण पेशवा बाळाजी बाजीरावाने कोल्हापूरचे संस्थान जप्त करण्यासाठी जप्तीची फौज कोल्हापूरवर रवाना केली. पेशव्याच्या फौजा बु-हाणपुराकडे गेल्याचे आणि कोल्हापूरच्या जप्तीबद्दल रदबदली करण्याची कृष्णरावपंत अमात्याची व स्वतः अनुबाईची पत्रे तिने बु-हाणपुरला रवाना केल्याचे कृष्णरावाला कळविले. पत्राच्या शेवटी कोल्हापूरच्या राज्याच्या जप्ती बद्दल काही करण्याची असमर्थता अनुबाईने व्यक्त केली आहे. तिने पत्राच्या शेवटी कृष्णरावाला असे लिहिले ,

> "जप्तीची फौज आली ती उगीच कशी राहते. सर्व गोष्टी प्रतिकूल. त्यात अनुकूल काय पहावे ? तुम्ही इकडील मान मार्ग पाहून वर्तावे त्याच रितीने वर्तावे ( हे ) उत्तम आहे ईश्वराभास मनुष्ययत्न नाही हे आशिर्वाद..." ७

या पत्र व्यवहारावरून असे दिसते की कृष्णरावपंत अमात्य याने आपल्या परीने कोल्हापूर राज्यावरील पेशव्यानी केलेली जप्ती उठविण्याचा प्रयत्न केला होता. तथापी अनुबाई घोरपडे आणि विशेषतः पुण्याच्या पेशव्यानी कोल्हापूरबद्दल विनाकारण कठोर धोरण स्विकारलेले होते. ही जप्ती नंतर आलेल्या माधवराव पेशवे यांनी उठवली.

कृष्णराव भगवंत याने आपल्या सेवकांना सुध्दा अतिशय चांगली वागणुक दिली. त्याशिवाय वेळोवेळी त्यांचा पराक्रम, त्याची निष्ठा व काम बघुन त्यांना इनाम वतने दिली. ७-२-१७६१ रोजी कृष्णरावाने त्र्यंबकराव यादव यास तर्फ हवेली, प्रांत कोल्हापूर येथील नाइकीचे वतन इनाम करुन दिले आहे. त्या पत्रात ते म्हणतात,

> ' तुम्ही व तुमचे वडिलाही स्वामी सेवाबहुत निष्ठेने केली व हाली करीत आहा. तुमचे चालवणे आवश्यक जाणून नाईकीचे वतन करार करुन दिल्हे असे तरी वतनास इनाम व हक कानू कायदे करार केले आसेत. ' ६

कोकण प्रांतातील वतनदारापासून कर्जपट्टी गोळा करण्याच्या आज्ञा १७६१ मध्ये पेशवे शासनाने दिलेल्या होत्या. या प्रांतात कृष्णरावाकडे तर्फ साळशी व खारेपाटण या महाली वतनी व इनाम गावे व सरदेशमुखीचे वतन होते. पेशव्यांच्या आज्ञेप्रमाणे नारो त्र्यंबक याने कर्जपट्टीचा तगादा कृष्णराव भगवंत यांच्याकडे लावला ही बातमी पेशवा माधवराव यास कळताच त्याने नारो त्र्यंबक यास पत्र पाठवून कृष्णराव भगवंत यांच्या वतनाची व सरदेशमुखी बद्दल कर्जपट्टी घेऊन नये अशी आज्ञा काढली व त्याप्रमाणे सनद पाठविली. '

कृष्णरावासंबंधी उल्लेख असणारे हे शेवटचेच पत्र आहे. या पत्राची तारीख ८-११-६१ ही आहे म्हणजे ८ नोव्हेंबर १७६१ नंतर कृष्णरावाचा मृत्यु झाला असावा.

टीपा

१. आ.बा.जोशी आणि आबा चांदोरकर, श्रीशिवशाहीचा लेखनालंकार (पुणे :आबा चांदोरकर प्रकाशन, १९३४ ) प.क्र. ११, पृ.क्र. ४५.

२ आ.ग.पवार (संपा. ), जिजाबाईकालीन कागदपत्रे (कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ प्रकाशन, १९७५) प.क्र. २, पृ.क्र. २४.

३ रा.म.गोरे, बावडेकर पंत अमात्य हुकूमतपन्हा यांचे वंशवृत्त (प्रकाशनाचा तपशिल उपलब्ध नाही.) पृ.क्र. ९६.

४ कित्ता, पृ.क्र. ९७.

५. आ.ग.पवार(संपा. ), ताराबाईकालीन कागदपत्रे, (कोल्हापूर :शिवाजी विद्यापीठ, प्रकाशन १९७२), खंड २रा, प.क्र. ११९, पृ.क्र. १४७.

६ गोरे, तत्रैव - पृ.क्र. ९८.

७ स.मा.गर्गे (संपा. ), करवीर रियासतीची कागदपत्रे, (पुणे : गर्गे स.मा. ), खंड २रा, ले.क्र. १, पृ.क्र. १. (पारसनिसी दप्तर : ४७१०-२२ जानेवारी १७६१ )

८ आ.ग.पवार (संपा. ), ताराबाईकालीन कागदपत्रे (कोल्हापूर शिवाजी विद्यापीठ, प्रकाशन) १९७२ ) खंड २रा, प. क्र. १५८, पृ.क्र. २१९.

१. कोल्हापूर पुराभिलेखागार, बावडा दप्तर,
रु.क्र.५.का.क्र.१२०.